कायम विना अनुदानित

जा.क्र.माबि-१/२०१०-११/ 21681/83
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
दिनांक :- 17 JUL 2010

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,
जालना

विषय :- शासनाने परवानगी दिलेल्या माध्यमिक शाळांना इ. ५ वी ते ७ वीचे वर्ग कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत..

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. एसएसएन-१०९७/(५२८/९९)/माशि-१, दि.१.३.१९९९.
२) शासन निर्णय क्र. एसएसएन-२०००/(४४/२०००)/माशि-१, दि. ९.८.२००१.
३) शासन निर्णय क्र. एसएसएन-२००२/(२५६/०२)/माशि-१, दि. २५.२.०३.
४) शासन निर्णय क्र. एसएसएन-२००२(२५६/२००२)/माशि-१, दि.२७.६.२००३.
५) आपले पत्र क्र. जिपजा/शिक्षण/मा-३/कावि/२००९-१०/ दि. ३१.३.२०१०.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ ते ४ नुसार खाजगी माध्यमिक शाळांना इ. ५ वीचा वर्ग मंजूर करण्याबाबत निकष विहित करण्यात आले आहे. संदर्भ क्र. ५ नुसार खाली नमूद केलेल्या संस्थेस इ. ५ वीचा वर्ग कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्यासाठी आपण शिफारस केली आहे.

संदर्भ क्र. ४ येथे नमूद शासन आदेशात निर्देशीत केल्याप्रमाणे संस्थेने सदर वर्गांना भविष्यामध्ये शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही व सदर वर्ग कायम विना अनुदान तत्वावर चालविण्यात येतील असे हमीपत्र रु.२०/- च्या बंधपत्रावर सादर केले आहे.

प्रस्तावास आपण केलेली शिफारस विचारात घेवून संदर्भ क्र. १ नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या संस्थेस नांवासमोर दर्शविल्या प्रमाणे इ. ५ वीचा वर्ग सुरु करण्यास **कायम विना अनुदान** तत्वावर परवानगी देण्यात येत आहे. ही परवानगी खालील अटींच्या अधिन राहील.

१) इ. ५ वी ते ७ वी मध्ये किमान ३० विद्यार्थी पट संख्या टिकविणे आवश्यक आहे.
२) इ. ५ वीचा वर्ग मंजूर करतेवेळी माध्यमिक शाळेत इ. ८ वी ते १० वीचे वर्ग मंजूर असणे आवश्यक आहे.
३) इ. ५ वीचा वर्ग या कार्यालयाकडून मंजूर झाल्यानंतर इ. ६ वी व ७ वीचे वर्ग मंजूर करण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना राहतील.
४) इ. ५ वीचा वर्ग जोडण्याचा अर्ज करतांना त्या ठिकाणी इ. ४ थीच्या पटावर किमान ३५ विद्यार्थी संख्या आवश्यक राहील. (तथापी, आदिवासी/ दुर्गम डोंगराळ भाग, व अल्पसंख्यांक शाळामध्ये किमान २० विद्यार्थी संख्या)
५) इ. ५ वी करीता अर्ज करणाऱ्या संस्थेजवळ अतिरिक्त वर्ग खोली, फर्निचर व अन्य साधन सामग्री असणे आवश्यक असेल..
६) सदर वर्ग कायम विना अनुदान तत्वावर असे दर्शनी भागावर मोठ्या अक्षरात लिहून ठेवणे आवश्यक राहील.
७) विद्यार्थ्यांकडुन जादा फी आकारण्यात येणार नाही.

| अ.क्र. | संस्थेचे/शाळेचे नांव | वर्ग | वर्ष | माध्यम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना संचलित मत्स्योदरी विद्यालय, कुंभारपिंपळगांव ता. घनसावंगी जि. जालना | ५ वी | २००९-१० | मराठी | प्रथम वर्ग<br>कायम विना अनुदान<br>तत्वावर |

(सु. र. चौहान)
शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

प्रतिलिपी माहितीस्तव सादर.

१) मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत :- मुख्याध्यापक, मत्स्योदरी विद्यालय, कुंभारपिंपळगांव ता. घनसावंगी जि. जालना.